महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

वाणिज्य विभाग, प्रकाशगड - ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

फोन (वै)२६४४७७५३ (का)२६४७४२११, फॅक्स २६४७४३६६

क्र.पी आर-३/कॅस/४२६३ दिनांक :१७.०२.२००६

**वाणिज्य परिपत्रक क्र.२९**

**विषय :- वीज ग्राहकांकरिता वीज देयके भरण्याची अंतीम मुदत निश्चिती व शासकीय कार्यालयांना वीज देयके भरण्यास मुदतवाढ.**

महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी), विनियम २००५ च्या कलम १५.५ च्या उपकलम १५.५.१ मध्ये वीज देयके भरण्याची अंतिम मुदत घरगुती व कृषी ग्राहकांकरीता २१ दिवसापेक्षा कमी नसावी व इतर वीज ग्राहकांकरीता वीज देयके भरण्याची अंतिम मुदत १५ दिवसापेक्षा कमी नसावी असे नमुद केलेले आहे. अशा प्रकारे दिलेल्या मुदतीमध्ये वीज ग्राहकाने वीज देयकाचा भरणा करणे आवश्यक आहे. अशा विहित मुदतीमध्ये वीज देयकाचा भरणा न केल्यास विनियम २००५ च्या उपकलम १५.५.४ मध्ये विलंब आकार लावण्याची तरतूद आहे, व त्याप्रमाणे विलंब आकार लावला जातो.

वरील प्रमाणे विनियम २००५ नुसार घरगुती व कृषि ग्राहकांच्या देयकात दर्शविण्यात येणारी वीज देयके भरण्याची अंतिम मुदत देयकाच्या तारखेपासून २१ दिवसापेक्षा कमी नसावी तसेच इतर ग्राहकांकरीता हि मुदत १५ दिवसापेक्षा कमी दर्शविण्यात येऊ नये व याप्रमाणे देयकात दुरुस्ती करण्यात यावी.

तथापि, शासकीय कार्यालयांना वीज देयके भरण्यास वेळ लागतो. वीजेची देयके शासकीय कार्यालयांना प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या विहित कार्यपध्दतीनुसार वीज देयक लेखा अधिदान अधिकाऱ्यांना पाठवावी लागतात व बीले मंजूर होण्यास काही अवधी लागतो.

उपरोक्त बाब विचारात घेऊन शासनाचे पत्र क्र.बी.ई.एस.टी./ १०९० / सी आर / १७७० / ऊर्जा- २ दिनांक १८.१०.९१ च्या संदर्भाने शासकीय कार्यालयांची वीज देयके भरण्याची अंतीम मुदत इतर ग्राहकांप्रमाणे न देता जी शासकीय कार्यालये देयकाच्या तारखेपासून तीस (३०) दिवसांचे आत वीजेची देयके भरतील त्यांना विलंब आकार लावण्यात येऊ नये. तसेच त्यांचे विलंब आकार माफ करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

या नुसार शासकीय कार्यालयांची बील भरण्याची कार्यपध्दती व बील भरण्यास लागणारा वेळ लक्षात घेता जी शासकीय कार्यालये बीलाच्या तारखेपासून तीस (३०) दिवसाच्या आत बील भरणा करतील अशा शासकीय कार्यालयांना विलंब आकार लावण्यात येऊ नये व लावण्यात आलेला विलंब आकार माफ करण्याचे अधिकार संबंधित सहाय्यक अभियंता / उप कार्यकारी अभियंता यांना प्रदान करण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी जी शासकीय कार्यालये ३० दिवसांच्या आत वीज बिलाच्या रकमेचा भरणा करतील त्यांना विलंब आकार लावण्यात येऊ नये.

**मुख्य अभियंता(वाणिज्य)**

**प्रत रवाना -**

१. मुख्य अभियंता, सर्व सं.व सु., परिमंडळे, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

२. अधीक्षक अभियंता, सर्व सं.व सु., मंडळ कार्यालये, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

३. कार्यकारी अभियंता, सर्व सं.व सु., विभागीय कार्यालये, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

४. उप कार्यकारी अभियंता, सर्व सं व सु., उप विभागीय कार्यालये, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

५. सहाय्यक अभियंते, सर्व सं व सु., उप विभागीय कार्यालये, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

C:\RBB\Government office.doc

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com